Review of Research
International Online Multidisciplinary Journal
ISSN : 2249-894X Impact Factor 3.1402 (UIF) Volume -5 | Issue - 6 | March - 2016

# अध्ययन अध्यापन प्रकियेत आय. सी. टी. चा उपयोग



प्राचार्य. डॉ. झेंडे सुखदेव सिताराम
शिक्षणशास्त्र महाविद्यालय ( बी. एड.), माढा, तालुका माढा. जिल्हा सोलापूर.

## प्रस्तावना:

आजचे युग हे जागतिकीकरणाचे आहे. जागतिकीकरण ही ठळकपणे पुढे येणारी अपरिहार्य वस्तुस्थिती आहे. कुठल्याही देशाची इच्छा काहीही असो. त्याना जागतिकिकरणात सामील व्हावेच लागेल. जागतिकिकरणाचे दोन ठळक परीणाम आहेत. त्यामुळे जगातील सर्व देशाना एकमेकाशी सहकार्य करावे लागते आहे परंतू त्याच सोबत जगाचे दोन भागात विभाजन करते आहे.जागतिकिकरणामुळे जगातील देशांमध्ये आणि प्रत्येक देशात सुध्दा, आर्थिक दरी रुदावतेय. मानवाच्या प्रगती मागे जागतिकिकरण हे महत्वयाचे कारण आहेच. पण त्यामुळे संपुर्ण मानव समुहात एक दरी सुध्दा निर्माण झालेली आहे. जसे. अजुनही फक्त काहीच लोकांना संगणक व महाजाल (Internate or Web) उपलब्ध आहेत आणि वापरता येतात. बहुतेक लोकांना अजूनही संगणक व महाजाल उपलब्ध नाहीत किंवा वापरता येत नाहीत. हयालाच " Digital Divide " असे म्हणतात.

आधुनिक काळात तंत्रज्ञानात झालेली प्रचंड प्रगती हे जागतिकीकरणाचे प्रमुख कारण आहे. या प्रगतीमुळे आपले संपूर्ण सामाजिक जीवन सुध्दा ढवळून निघत आहे.तंत्रज्ञानातील प्रगती "Digital Divide" च्या दोन्ही बाजूला प्रचंड बदल घडवत आहे. जुन्या रोजगार संधी नामशेष होत आहेत.परंतु. त्याचसोबत आजपर्यंत अस्थित्वात नसलेल्या.नवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत.समाज जीवनावर होणारा हा परिणाम.कधी कधी भयावह वाटावा. एवढा मोठा आहे.

आज तंत्रज्ञान जीवनातील प्रत्येक अंग व्यापत आहे. तरी देखील.तंत्रज्ञानाचा शिक्षण प्रणालीत फार मोठा शिरकाव अगदी आता आता पर्यंत तरी झालेला नव्हता.मुद्रण तंत्रज्ञानानंतर.जवळ जवळ गेल्या ५०० वर्षा पासून.आपल्या शिक्षणप्रणलीने कुठल्याही महत्वाच्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर फारसा आत्मसात केलेला

नाही.परंतु संगणक महाजालाच्या (Internet or Web ) निर्मिती नंतर मात्र .आता शिक्षण प्रणालीत देखील आमुलाग्रह बदल होण्यास सुरुवात झालेली आहे.या तंत्रज्ञावर आधारीत शिक्षण प्रणालीची (E-Learning ) ओळख करुन घेणार आहोत.

## उपयोग तंत्रज्ञानाचा

- **गुणवत्ता उच्च असायला हवी –**

(Quality) सर्व विद्यार्थी आणि समाज.यांच्या आपल्या शिक्षणप्रणालीकडून. नमूद केलेल्या.सर्व इच्छा.गरजांची व आकांक्षाची.कमीत कमी खर्चात होणारी पूर्तता म्हणजेच गुणवत्ता.शिक्षणाची गुणवत्ता हा आपल्या शिक्षणप्रणाली समोरचा खूपच महत्वाचा प्रश्न आहे.भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या आणि विकसनशील देशातील शिक्षण प्रणालीवर होणारा खर्च लक्षात घेता गुणवत्ता हा प्रमुख मुद्दा ठरतो. येथे बहुतेक गरीब घरातील मुले, काहींना काही काम करुन मिळणारे उत्पन्न देऊन, घरखर्चामध्ये आपला वाटा उचलत असतात. साहजिकच, शिक्षण घेण्याचा पर्याय निवडला तर त्यांच्या कुटुंबाला हया उत्पन्नाला मुकावे लागते. केवळ गुणवत्ता पुर्ण शिक्षण असल्यास, चांगले उत्पन्न देऊ शकेल असे “ज्ञान व क्षमता ” शिक्षणाकडुन भविष्यात मिळेल हया अपेक्षेने, हा तोटा आज सहन करण्यास मुलांची कुटुंबे तयार होऊ शकतात. उच्च शिक्षणतील सुमार गुणवत्तेवर नेहमीच चर्चा होताना दिसते. शिक्षण प्रणलीची सुमार गुणवत्ता हा एक काळजीचा विषय झालेलाच आहे.


- **किमंत कमी असायला हवी.—**

(cost) दुसरा मुघा म्हाणजे किंमत. जास्त किमतीमुळे सगळयांना शिक्षण परवडत नाही. हयामुळे ठराविक उच्च आर्थिक वर्गातील विद्यार्थीच शिक्षण घेऊ शकतील आणि जर गुणवत्ता म्हणजे कमीत कमी खर्चात इच्छा, गरजांची व आकांक्षाची होणारी पुर्तता असेल, तर जास्त किंमतीमुळे ”उपलब्धता(Access)“ आणि “गुणवत्ता (Quality)”दोन्ही कमी होतील.

- **उपलब्धता .—( Access) जास्त असायला हवी.—**

आज बहुसंख्य लोकांपर्यंत शिक्षण पोहचत नाही. आजपण जगातील अंदाजे १० कोटी मुले कधीही शांळेत जात नाहीत. त्याही पेक्षा जास्त मुलांना उपयुक्त ज्ञान व क्षमता देऊ शकेल एवढे शिक्षण आपण देऊ शकत नाही. जगातील अंदाजे ८० कोटी प्रौढ आजही निरक्षर आहेत. जगातील सर्व लोकांना आज शिक्षणची नितांत गरज आहे. फक्त हे शिक्षण प्रणाली समोरचा मोठा प्रश्न आहे.

**शिक्षणाचा त्रिकोण.—** वरील तीन उद्दिष्टे त्रिकोणाच्या तीन बाजू म्हणून खालीलप्रमाणे दर्शवता येतात. कमीत कमी किमतीत उच्च गुणवत्ता आणि जास्तीत जास्त उपलब्धता एकाच वेळेस देणे म्हणजेच शिक्षणप्रणालीची चांगले प्रशासन होय.




पण थोडासा विचार केल्यास अस्वस्थ करणारी एक वस्तुस्थिती लक्षात येईल. माहीत असलेल्या कुठल्याही मार्गाचा अवलंब करुन. सध्याची पारंपारीक शिक्षणप्रणाली वरील अपेक्षित बदल घडवू शकत नाही.

जर आपण प्रत्येक वर्गात जास्त विद्यार्थी बसविले तर शिक्षणची उपलब्धता वाढेल, फी कमी करता येईल, पण त्याचसोबत कमी गुणवत्तेचा देखील आपल्यावर आरोप होईल.

प्रत्येक वर्गात कमी विद्यार्थी संख्या असेल तरच शिक्षकाची परीणामकारकता सध्याच्या पारंपारीक शिक्षणप्रणालीत वाढते. उच्च गुणवत्ते साठी ही परीणमकारकता वाढविली तर प्रत्येक वर्गातील कमी विद्यार्थी संख्येमुळे उपलब्धता कमी होईल आणि त्यामुळे फी वाढवावी लागेल.

पारंपारीक शिक्षणप्रणालीत उच्च गुणवत्तेसाठी उपलब्धता कमीच करावी लागते आणि त्यासोबत फी सुध्दा वाढवावीच लागते.खरोखरच, पारंपारीक शिक्षणप्रणाली समोरचा हा एक गहन व क्लिष्ट प्रश्न आहे. एका अर्थाने, हा प्रश्न म्हणजे आपल्या शिक्षण प्रशासनासमोर प्रमुख आव्हानच आहे.

जगातील संशाधनाचे निष्कर्ष हे दर्शवितात की फक्त तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणप्रणालीच, कमीत कमी किमतीत शिक्षणाची उच्च गुणवत्ता आणि जास्तीत जास्त उपलब्धता, एकाच वेळेस देणे शक्य आहे. तंत्रज्ञानाचा वापर हयाकरिता कसा करायचा हे मात्र आपण हया लेखमालेतील पुढील लेखात बघणार आहोत.

**संदर्भ :—**

१ — शैक्षणिक तंत्रज्ञान — सुमनओक
२ — शैक्षणिक तंत्रज्ञान —डी.आर कुलकर्णी
३ — शैक्षणिक तंत्रविज्ञान — ह.ना.जगताप
४ — www.killedar.org (http:// www.killedad.org )